# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड          डी.सी.आर.          दिनांक   ०८/०६/२०१८**

## प्रसिध्दी पत्रक

नांदेड जिल्हयातील सर्व शाळांना कळविण्यात येते की, या जिल्हयाच्या जिल्हा स्कुल बस सुरक्षितता समितीची बैठक दिनांक २२.०५.२०१८ रोजी मा. अध्यक्ष तथा पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये मा. अध्यक्ष तथा पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी जिल्हयातील सर्व शाळांना त्यांच्या शाळेतील विदयार्थ्याची ने-आण करणाऱ्या वाहनाचे वाहन क्रमांक, वाहन धारकाचे नाव, त्यांचा पत्ता, व दुरध्वनी क्रमांक इ. माहितीच्या नोंदी शाळेत ठवण्याबाबत सुचित केलले आहे.

तसेच शालेय मुलांची वाहतूक करण्यास्तव नोंद झालेली (स्कुल बस) वाहने हे स्कुल बस नियमावलीतील सुरक्षाविषयक तरतुदीचे काटेकोरपणे पालन करतात किंवा कसे याची प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन मोफत तपासणी करण्यात येणार असल्यामुळे मा. अध्यक्ष तथा पोलीस अधीक्षक यांनी जिल्यातील सर्व शाळांना आदेशित केलेले आहे की, त्यांचे शाळेतील मुलांची वाहतूक करणाऱ्या वाहन धारकांनी त्यांचे वाहन सदर नियमाची पुर्तता करते किंवा नाही या बाबत तपासणी करण्याचे बंधनकारक करण्यात यावे. जे वाहनधारक सदर तपासणी करुन घेणार नाहीत, अशा वाहनांतुन शालेय विदयार्थी वाहतुकीस परवाणगी मिळणार नसल्याचे पालकांना सुचित करण्याचे आवहन मा. अध्यक्ष तथा पोलीस अधीक्षक, जिल्हा स्कुल बस सुरक्षितता समिती, नांदेड यांनी केलेले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

# प्रेस नोट                 दि. ०८.०६.२०१८

शहर वाहतूक शाखा, नांदेडच्या वतीने नांदेड शहरातील शाळेसाठी लावण्यात आलेले ॲटो तसेच मॅक्झीमो व स्कुल बस या वाहन चालकांना आवाहान करण्यात येते की, दि.१६.०६.२०१८ पासुन शाळा सुरू होत असुन आपण आपल्या वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसविण्यात येवु नये. कायदयाचे उल्लंघन केल्यास त्यांचे विरुध्द मोटार वाहन कायदयाप्रमाणे दंडात्मक कारवाई करुन सदर वाहनाचा परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल.

तसेच पालकांना सुध्दा सुचीत करण्यात येते की, आपल्या मुलांना सुरक्षीततेच्या दृष्टीकोनातुन आपली जबाबदारी समजुन घेवुन आपण ॲटो तसेच मॅक्झीमो व स्कुल बस चालकांची खात्री करावी व ज्या वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवितात अशा वाहनात आपण आपले पाल्यांना पाठवु नये. कांही अपरिचीत घटना घडल्यास वाहन चालकावर व पालकावर कारवाई करण्यात येईल.

तसेच १८ वर्षाच्या आतील मुले /मुली यांनी वाहन चालुव नये, वाहन चालवित असतांना मिळुन आल्यास वाहन मालकावर मा. न्यायालयात खटला पाठविण्यात येईल.

ॲटो चालकांना सुचीत करण्यात येते की, त्यांनी यापुढे ड्रेस कोडचे पालन करावे.अन्यथा त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्यात येईल. याची खबरदारी घ्यावी.

**(गणेश माणिकराव सोंडारे)**
पोलीस निरीक्षक,
शहर वाहतुक शाखा, नांदेड.